# सकाळ

१



घोषणांच्या सरींत मराठवाडा 'चिंब'

किंमत ₹ ६ • आजचा अंक : जळगाव जिल्हा : पाने २२ (१०+४+८ पानी सप्तरंग)

सकाळ

रविवार today

जळगाव जिल्हा-शहर, रविवार, १७ सप्टेंबर २०२३


# शिंपी समाजातील गुणवंतांचा सत्कार

## 'ज्ञानज्योती', 'जीवनज्योती' पुरस्कार देऊन गौरव

**▸ सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. १६ : शिंपी समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना शुक्रवारी (ता. १५) ज्ञानज्योती, जीवनज्योती पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाबळ परिसरातील बाहेती शाळेत हा कार्यक्रम झाला.

बाहेती शाळेचे मुख्याध्यापक जे. पी. जाधव, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका रत्ना मालपुरे, इंडिया आशा फाऊंडेशनच्या संचालिका सुजाता बोरकर, मिनाताई सिरसाठे प्रमुख पाहुणे होते. आशा फाऊंडेशनच्या शिक्षीका रश्मी सिरसाठे, योगिता पाटील यांनी विशेष योगदान दिले. राकेश सिरसाठे यांनी सूत्रसंचालन केले. सुचित जाधव, मनोज भांडारकर, गौरव सिरसाठे, अतुल जगताप, जितेंद्र शिंपी यांनी सहकार्य केले. शिक्षण क्षेत्रात योगदान देणारे (कै) शांताराम सुकलाल सिरसाठे यांचे स्मृतिप्रित्यर्थ गेल्या २७ वर्षांपासून हे पुरस्कार देण्यात येतात. तर, सामाजिक कार्यासाठी जीवनज्योती पुरस्कारांमध्ये दरवर्षी नवीन एक शाळा व त्यातील वर्गास इंडिया आशा फाऊंडेशनच्या शार्प प्रोजेक्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी जीवनज्योती पुरस्कार देण्यात येतो. यामध्ये (कै.) ललित भास्कर शिंपे (पाचोरा) यांच्या स्मृतिनिमित्त विद्यार्थ्यांना ड्रॉइंग बुक, पेन्सिल, रबर, शार्पनर, रंगीत पेन्सिल सेट देण्यात आले.



**जळगाव : शिंपी समाजातील ज्ञानज्योती, जीवनज्योती पुरस्कार मिळालेल्या गुणवंतांसह मान्यवर.**

### यांचा झाला सत्कार

- मयूर जितेंद्र शिंपी (एम. टेक.), भाग्यश्री जितेंद्र शिंपी (बी. टेक.), प्रांजली अतुल जगताप (बारावीत ८१.६७ टक्के), अनुष्का अविनाश सिरसाठे, (बारावीत ७३ टक्के), ऋचा सुचित जाधव (दहावीत ८५.२० टक्के).

CamScanner


अग्नेय
ABCDEFGH
इंडिया आशा फौंडेशन
१५ ऑगस्ट
3A JUMBO DRAWING BOOK